महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २८ वे दिनांक : १९/०१/२०२६ वार : सोमवार

## नगरसेवक हॉटेलमध्ये ठेवण्यावर शीतल म्हात्रेंचे स्पष्टीकरण



**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवले असले, तरी हे बहुमत काठावरचे असल्याने राजकीय वर्तुळात 'घोडेबाजारा'ची चर्चा सुरू झाली आहे. फोडाफोडीच्या भीतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपल्या २९ नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. महापालिकेत महापौर आणि स्थायी समिती सभापती यांसारखी महत्त्वाची पदे मिळवण्यासाठी आपली 'बार्गेनिंग पॉवर' वाढवण्याचा हा एक भाग असल्याचे बोलले जात आहे.

या अनपेक्षित हालचालीमुळे आगामी काळात सत्तास्थापनेसाठी महायुतीमध्ये अंतर्गत रस्सीखेच होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या सर्व घडामोडींवर राजकीय वर्तुळात भुवया उंचावल्या गेल्या असताना, शिवसेना शिंदे गटाच्या महिला प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी या कृतीमागचे नेमके कारण स्पष्ट करत विरोधकांचे दावे खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

शीतल म्हात्रे म्हणाल्या, आम्ही महायुती म्हणून लढलो आणि जिंकलो आहोत, पाठीत खंजीर खुपसण्याची आमची भूमिका नाही. आम्ही महायुती म्हणूनच सत्तेत येणार आहोत. तसेच नगरसेवकांना हॉटेलवर ठेवण्यात आल्यासंदर्भात त्या म्हणाल्या, आमचे जवळपास २० नगरसेवक नवखे आहेत, त्यांना मनपाचे कामकाज माहित नाही. त्यामुळे त्यांच संदर्भाने दोन दिवसीय शिबिर घेतले आहे. त्यासाठीच हे नगरसेवक हॉटेलमध्ये आहेत. हे उबाठाच्या नगरसेवकांना हरवून आले आहेत, असेही म्हात्रे म्हणाल्या. इतकेच नव्हे तर महायुती ही बाळासाहेब यांनी केलेली नैसर्गिक युती आहे. बार्गेनिंग पॉवर वाढवण्यासाठीचा हा विषय नसल्याचेही म्हात्रे यांनी स्पष्ट केले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे नाश्ता करण्यासाठी हॉटेल ताज लँड्स एन्डमध्ये जाणार आहेत, यावर शीतल म्हात्रे यांनी प्रतिक्रिया देताना बोचरी टीका केली आहे. त्या म्हणाल्या, संजय राऊत म्हणजे चाकरी सिल्व्हर ओकची आणि भाकरी मातोश्रीची असे आहे. सगळ्यांना खड्ड्यात घातले, खासदारकी संपत आली आहे. तीही शिंदेंच्या कृपेमुळे आली होती. नगरसेवकांना मस्का मारायला येणार असतील नाहीतर मला शिंदेंकडे घेऊन चला म्हणायला येतील, असा टोलाही म्हात्रे यांनी लगावला आहे.

दरम्यान, मुंबई महानगरपालिकेत बहुमतासाठी आवश्यक ११४ हा आकडा गाठण्यासाठी भाजपकडे ८९ जागा असल्याने त्यांना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची मदत घेणे अपरिहार्य ठरले आहे. या स्थितीचा फायदा घेत शिंदे गटाकडून महापौरपदाचे अडीच-अडीच वर्षांचे सूत्र आणि स्थायी समितीसह अन्य महत्त्वाच्या समित्यांमध्ये प्रभावी प्रतिनिधित्वाची मागणी केली जाण्याची दाट शक्यता आहे. सत्तास्थापनेसाठी सुरू असलेल्या या अटी-शर्तींच्या राजकारणामुळे आणि संभाव्य वाटाघाटींमुळे मुंबईच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे दिसत असून, महायुतीमधील सत्तेचे हे समीकरण नेमके कसे जुळते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिंदेंच्या शिवसेनेचे नगरसेवक ठाकरे गटाच्या संपर्कात?

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला यश मिळाले असले, तरी काठावरचे बहुमत मिळाले आहे. त्यामुळे मुंबईचा महापौर कोणाचा होणार? यावरून कमालीची गुप्तता आणि रस्सीखेच पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या सर्व 29 नगरसेवकांना वांद्रे येथील 'ताज लँड्स एन्ड' या पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. भाजप नेते देवेंद्र फडणवीस सध्या दावोस दौऱ्यावर असताना मुंबईत मोठा 'दगाफटका' होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचदरम्यान, एकनाथ शिंदेंचे काही नगरसेवक ठाकरे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून मुंबईच्या राजकारणात पुन्हा उलथापालथ होणार का? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

बीएमसी निवडणुकीत भाजपने 89 जागांवर विजय मिळवला असून, त्यांना 114 हा बहुमताचा आकडा गाठण्यासाठी शिंदे गटाच्या 29 नगरसेवकांची मदत अनिवार्य आहे. हीच संधी साधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून भाजपसमोर अडीच-अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच "जर देवाची इच्छा असेल तर मुंबईचा पुढचा महापौर आपलाच असेल," असे सूचक वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या विधानामागे अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

'द न्यू इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार, शिंदे गटाचे काही नवनिर्वाचित नगरसेवक उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. या नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांच्या अत्यंत विश्वासू व्यक्तीला फोन करून, "आमच्या मनात उद्धवजी आणि आदित्य ठाकरे यांच्याबद्दल कोणतेही वैर नाही," असे स्पष्ट केल्याचे समजते. या गुप्त वाटाघाटींची कुणकुण लागताच उपमुख्यमंत्री शिंदेंनी तातडीने आपल्या नगरसेवकांची रवानगी हॉटेलमध्ये केली असून, महापौर निवडीपर्यंत त्यांना तिथेच ठेवले जाणार आहे.

दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील आजच्या पत्रकार परिषदेत अनेक सूचक विधाने केली आहेत. ते म्हणाले, "मुंबईचा महापौर शिवसेनेचा किंवा ठाकरे बंधुंचा व्हावा, यापेक्षा भाजपचा होऊ नये ही सगळ्यांची भावना आहे. देवाची इच्छा असेल, शिवसेनेचा महापौर बसू शकतो, असे उद्धव ठाकरे यांनी काल सांगितले. काल मी सकाळी राज ठाकरेंची भेट घेतली. दोन्ही भावांमध्ये मोबाईलवरून चर्चा झाली. अनेकांशी चर्चा सुरू आहे. आम्ही सध्या तटस्थपणे या सगळ्या हालचालींकडे पाहत आहोत, पण पडद्यामागे बऱ्याच गोष्टी घडत आहे," असा दावा संजय राऊत यांनी केला.

## योगिता अरूण गवळींच्या पराभवावर पतीची भावनिक पोस्ट



**मुंबई :** महापौरपदाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच, 'डॉन' अरुण गवळी यांची कन्या योगिता गवळी यांना मात्र या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. या निकालानंतर त्यांचे पती आणि प्रसिद्ध अभिनेता अक्षय वाघमारे यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत योगिता यांच्या जिद्दीचे व त्यांनी दिलेल्या लढ्याचे मनापासून कौतुक केले आहे. पराभवाने खचून न जाता योगिता यांनी केलेल्या कष्टाचा आणि जनसेवेचा आपल्याला अभिमान असल्याचे अक्षयने या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

योगिता यांना भाजपचे उमेदवार रोहिदास लोखंडे यांच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला. योगिता यांच्या पराभवानंतर त्यांचे पती अभिनेते अक्षय वाघमारे यांनी पोस्ट लिहिली आहे. ते म्हणाले, प्रिय बायको, सर्वप्रथम तुझे मनापासून आभार आणि मला तुझा प्रचंड अभिमान आहे. प्रेग्नन्सी आणि त्यानंतर अवघ्या एका महिन्याच्या मुलीची आई असताना, एवढी मोठी जबाबदारी खांद्यावर घेऊन तू ज्या धैर्याने ही निवडणूक लढवलीस, ते खरंच थक्क करणारं आहे. पुढे अक्षय लिहितात, सत्ताधारी असो किंवा विरोधक, भाजप, शिंदे गट, ठाकरे गट किंवा मनसे...कोणाच्याही तुलनेत वैयक्तिक पातळीवर तुला सर्वाधिक ६३०० मतं मिळाली. तुझ्या आसपासही कुणी नाही, हे तू पुन्हा एकदा सिद्ध केलं आहेस. मम्मी, पप्पा, तू आणि अखिल भारतीय सेनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रामाणितक कष्टाची ही पावती आहे. भायखळाच्या जनतेनं तुला भरभरून प्रेम दिलं. हे प्रेम पाहून स्पष्ट होतं की, लोकांसाठी तू आधीच निवडून आली आहेस. जनतेनं जातीपातीच्या राजकारणापेक्षा तुझ्या कामावर अन् विकासावर विश्वास ठेवला आहे. गेल्या काही महिन्यांत तू घेतलेले कष्ट आणि तुला होणाऱ्या वेदना मी जवळून पाहिल्या आहेत. आपली मोठी मुलगी आणि नुकतंच जन्मलेलं बाळ.. या दोघींना सोडून तू १२-१२ तास काम करायची. कधी कधी तुझी आणि मुलींची भेट व्हायची नाही. तरीही तू फोनवरून त्यांची काळजी घ्यायची. तुझ्यातली हळवी आई मी अनुभवली आहे

तुला बऱ्याचदा शारीरिक वेदना झाल्या. परंतु, तू कधीही याची तक्रार केली नाहीस. चिडली नाहीस, किंवा रागावली नाही. तुझा शांत अन् संयमी स्वभाव हीच तुझी खरी ताकद आहे. जनतेने तुझ्यावर आणि डॅडी यांच्या कतृत्वावर मोहोर उमटवली आहे. हा पराभव नक्कीच तुझा नाही. तर, तुझी ही राजकारणातील धमाकेदार एन्ट्री आहे. मला तुझा खूप अभिमान आहे. आता आणखी जिद्दीने कामाला लागूया. लव्ह यू आलवेस, असे अक्षय वाघमारे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ जानेवारी २०२६


## माळीवाडा येथे बाल लैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्याबाबत मार्गदर्शन शिबिर संपन्न



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जिल्हा परिषद शाळा माळीवाडा येथे दि. १७ शनिवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या वतीने बाल लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा (POCSO) यासंदर्भात मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात दिवाणी न्यायालयाच्या वरिष्ठ स्तर न्यायाधीश वैशाली फडणीस यांनी विद्यार्थ्यांना कायद्याची सविस्तर व सोप्या भाषेत माहिती दिली.मार्गदर्शन करताना वैशाली फडणीस यांनी बालकांच्या सुरक्षिततेसाठी या कायद्याचे महत्त्व, बाल लैंगिक शोषणाची ओळख, तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया तसेच समाजाची व पालकांची जबाबदारी यावर प्रकाश टाकला. अशा प्रकारच्या जनजागृतीमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमास संरपच ज्योती नंदकिशोर मुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य हेरोडे सर, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक फेरोज तडवी , ग्रा. प. सदस्य मंदाकिनी किर्तीकर, ताराबाई तुपे,बिजलाबाई साठे, अगनवाडी शिक्षीका, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक तसेच विद्यार्थी व महिला मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ज्योती घोरपडे यानी केले.

## चिमुकल्यांच्या 'खाऊ गल्ली'ने वेधले ग्रामस्थांचे लक्ष; चापानेर येथे 'आनंदनगरी' उत्साहात साजरी



**चापानेर (प्रतिनिधी) :** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्यातील उपजत कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना व्यावहारिक जगाची ओळख व्हावी, या उद्देशाने श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे 'आनंदनगरी' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवातील चिमुकल्यांच्या 'खाऊ गल्ली'ने संपूर्ण ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.महोत्सवाचे उद्घाटनदिनांक १७ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष दशरथ सोमासे सर आणि प्राचार्य कौशल्या सोमासे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी परिसरातील मान्यवर आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'शिक्षण म्हणजे केवळ पाठांतर नव्हे, तर जगण्याचे कौशल्य शिकणे होय,' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.चविष्ट पदार्थांची मेजवानीशाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पकतेने विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल सजवले होते. यामध्ये प्रामुख्याने: * झणझणीत बेत: पाणीपुरी, भेळ, वडापाव आणि समोसे. * गोड पदार्थ: बासुंदी आणि गुलाबजाम. * दाक्षिणात्य चव: गरमागरम इडली. * रिफ्रेशमेंट: लिंबू पाणी आणि सँडविच.विद्यार्थी स्वतः ग्राहकांना साद घालत होते, मालाची विक्री करत होते आणि हिशोबही ठेवत होते. चिमुकल्यांचा हा आत्मविश्वास पाहून उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले.हळदी-कुंकू समारंभमहोत्सवाचे औचित्य साधून शाळेत हळदी-कुंकवाचा कार्यक्रमही पार पडला. यामध्ये गावातील महिलांनी आणि विद्यार्थिनींच्या मातांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. यामुळे शाळेत एक कौटुंबिक आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.पालकांचा उदंड प्रतिसादया महोत्सवासाठी पालकांनी आपल्या पाल्यांना केवळ प्रोत्साहनच दिले नाही, तर खरेदी करून विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला. विद्यार्थ्यांमधील व्यवहारज्ञान आणि संघभावना वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज पालकांनी व्यक्त केली.यशस्वीतेसाठी परिश्रमहा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य कौशल्या सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक व कर्मचारी वृंद:संदीप वाकडे, केतन पवार,वर्षा जाधव, भारती पवार, मनिषा पवार, आकांक्षा वैष्णव, भाग्यश्री वैष्णव, अभिलाषा वारखिंडे, दिव्या लोखंडे, पूजा लोखंडे, अंकुश राठोड, राजू राठोड आणि कविता हिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भारतीय ज्ञान परंपरेतच समष्ठिचे कल्याण आहे - डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन




**फुलंब्री :** दिनांक १६ जानेवारी 2026 प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (PM-USHA) अर्थसहाय्याने श्री. संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर व प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय ज्ञान परंपरा : भाषा, साहित्य आणि संस्कृती" या विषयावर सामंजस्य कराराअंतर्गत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे उदघाटन केंद्रीय हिंदी संस्थान, आग्रा येथील निदेशक प्रो. डॉ. सुनील कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडले. तर यावेळी बीजभाषक म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे उपकुलसचिव, प्रो. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या हिंदी अभयास मंडळाच्या अध्यक्षा प्रो. डॉ. अपर्णा पाटील यांची लाभली.तर अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, मा. श्री निवृत्ती पा. गावंडे उपस्थित होते.याप्रसंगी चर्चासत्राच्या उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले. प्रस्तुत राष्ट्रीय चर्चासत्र उदघाटन प्रसंगी बोलत असतांना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरा हा विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आलेला विषय आहे. कारण पाश्चिमात्य शिक्षणाने केवळ विचार बदलला नाही तर आपल्या देशाप्रती कमीपणाचा भाव निर्माण केला गेला. या विचाराला संपविण्यासाठी भारतीय ज्ञान परंपरेचे महत्व अधोरेखित करण्यात आले. तसेच भारतीय ज्ञान परंपरेला पुढे घेऊन जायचे असेल तर या नवीन शैक्षणिक धोरणाची सुरुवात होणे आवश्यक होते. संस्कार देण्याची क्षमता भारतीय ज्ञान परंपरेत आहे. यातून येथील साहित्य आणि शब्दांचे भांडार कसे समृद्ध आहे. याबद्दल विवेचन केले. याप्रसंगी डॉ. अपर्णा पाटील यांनीही आपले मत व्यक्त केले.बीजभाषक म्हणून मांडणी करत असतांना डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन म्हणाले की, खऱ्या भारताच्या ज्ञानाची प्रतिमा पाहायची असेल तर नलंदा, तक्षशीला व वल्लभी या विद्यापीठांकडे पाहून लक्षात येते. ते आपल्याकडे नाहीत. परंतु, ज्या १८ विद्या, ६४ कला, ४ वेद, ६ दर्शन, १०८ उपनिषद, महाकाव्य रामायण, महाभारत यांतील ज्ञानसंपन्न विचाराने, परंपरांनी देशाच्या मूल्यांना समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न केला गेला. ती म्हणजे भारतीय ज्ञान परंपरा होय. भारतीय परंपरेतील चार पुरुषार्थावर विवेचन मांडत असतांना भारतीय ज्ञान परंपरा सत्य मार्गावर चालण्याचा संदेश देते. या अनुषंगाने मत व्यक्त केले.मान्यवरांचे आभार हिंदी विभागप्रमुख, प्रो. डॉ. दत्तात्रय येडले यांनी मानले. तर उदघाटन सत्राचे सूत्रसंचलन प्रो. डॉ. सुरेश मुंढे यांनी केले.परिषदेच्या दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील हिंदी विभागप्रमुख, प्रो. डॉ. संजय राठोड यांनी उपस्थितांना प्रस्तुत विषयावर मार्गदर्शन केले. तसेच इंद्रराज महाविद्यालय, सिल्लोड येथील प्राचार्य, डॉ. गुरुदत्त राजपूत यांनीही संवाद साधला.परिषदेच्या चौथ्या सत्रात एच. पी. टी. आर्टस्. आर. वाय. के. सायन्स महाविद्यालय, नाशिक येथील हिंदी विभागप्रमुख, प्रो. डॉ.विजयप्रसाद अवस्थी यांनी भारतीय ज्ञान परंपरा :भाषा, साहित्य व संस्कृती या विषयाच्या अनुषंगाने सखोल चिंतन मांडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रो. डॉ. शिवाजी सांगोळे उपस्थित राहीले.परिषदेच्या पाचव्या सत्रात अभ्यासकांनी शोधनिबंधांचे वाचन केले. तसेच या सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गोकुळ क्षीरसागर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप डॉ. शेख सर यांनी केला.परिषदेच्या समारोप सत्रात उपस्थित अभ्यासकांनी परिषदेच्या यशस्वीतेसंदर्भात मनोगते व्यक्त केली. तसेच यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड संस्कृत महाविद्यालय, वडोदरा येथील माजी अधिष्ठाता, प्रो. दीपेंद्रसिंह जाडेजा यांनी नालंदा विश्वविद्यालयातील पुस्तकांमध्ये एवढे अमाप असे ज्ञान होते की, या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना संशोधनासाठी करता आला असता. ते आपणांस जतन करता आले नाही. अशी खंत व्यक्त केली. तसेच पुढे ते असे ज्ञानाबद्दल बोलत असतांना म्हणाले की, समरसतेचा विचार हेच खरे ज्ञान आहे. त्याबरोबरच ज्ञान हे संस्कृतीचा आधार आहे. असे मत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे संचालक, डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी केला. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विवेकानंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य, डॉ. रविंद्र शिंदे व प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.परिषदेची सांगता वन्दे मातरम ने करण्यात आली.उपस्थित सर्व अभ्यासक, मान्यवरांचे आभार डॉ. सुरेश मुंढे यांनी मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ जानेवारी २०२६

## 'जागर बोलींचा' या कार्यक्रमासाठी सांकेतिक भाषा व बोली अभ्यासक प्रा. केशरचंद राठोड व ललिता गोपाळ यांची निवड





**कन्नड (अरूण थोरात) :** मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'जागर बोलींचा' हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. बोली भाषा जिवंत रहावी व बोलींचे जतन व संवर्धन व्हावे, या हेतूने हा निर्णय घेण्यात आला असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद महाविद्यालयात, छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार दि.१९/०१/२०२६ रोजी सकाळी नऊ ते दुपारी दोन या वेळेत 'बोलींचा जागर' हा कार्यक्रम संपन्न होणार असून, बोली व सांकेतिक भाषा अभ्यासक प्रा. केशरचंद राठोड व डॉ. ललिता गोपाळ यांची निवड भाषा संचालनालयाने केली आहे. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशात विविध बोली बोलल्या जातात. या बोलींना उजाळा मिळावा व त्यांचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून 'बोलींचा जागर' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात बंजारा, गोपाळ, समुदायाची बोली आणि सांकेतिक बोली बोलणारे लोककलावंत आपल्या लोककला सादर करणार आहेत. या कार्यक्रमाप्रसंगी जेष्ठ साहित्यिक डॉ. सतिश बडवे या कार्यक्रमाचे उद्घाटक असून डॉ. गणेश सावजी, कवयित्री विजयालक्ष्मी सणस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे हे असणार आहेत. दुसऱ्या सत्रात डॉ. समाधान इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्रात बोली अभ्यासक व संशोधक प्रा. केशरचंद राठोड हे 'बंजारा' बोली व 'सांकेतिक' बोलीवर भाष्य करणार असून, 'गोपाळ' बोलीवर डॉ. ललिता गोपाळ या विचार मांडणार आहेत. तरी या कार्यक्रमासाठी लोककलेचे ,बोलीभाषेचे अभ्यासक, मराठी प्रेमींनी मोठ्या संखेने उपस्थित राहण्याचे अवाहन भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन व मराठी विभागप्रमुख आणि समन्वयक डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी केले आहे.



**सामाजिक कार्यकर्ते आणि गोसेवक उस्ताद राजेश लहरे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना पाणी प्रश्नाचे अभ्यासक आणि वरिष्ठ फेलो डॉ. किशोर सूर्यवंशी, डॉ. संजय पाईकराव, डॉ.नामदेव कचरे आणि दैनिक महाराष्ट्र जनशक्ती तसेच एम.जे. न्यूज चे मुख्य संपादक प्राचार्य डॉक्टर हसन इनामदार**

## एनसीसीचा इतिहास; अर्जुन पाचंगेची दिल्ली परेडसाठी सलग दुसऱ्यांदा निवड



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट अर्जुन पाचंगे ची दिल्ली येथे होणाऱ्या 26 जानेवारी 2026 दिनी होणाऱ्या RDC प्रजासताक संचलन परेडसाठी दिल्ली येथील राजपथावर होणाऱ्या संबळ या कला प्रकारामध्ये त्याची महाराष्ट्राच्या मुलाच्या संघात निवड झाली आहे. मागच्या वर्षी सुद्धा 26 जानेवारी 2025 मध्ये महाविद्यालयातील कॅडेट वैभवी शेंडगेनी ड्रिल मधुन महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते.या वर्षी सुद्धा अर्जुन पाचंगे हा सलग दिल्ली येथे परेडसाठी जाणारा दुसरा कॅडेटचा बहुमान मिळऊन एनसीसी विभागाचा इतिहास रचला आहे.आज पर्यंत लातूर बटालियन मधुन सलग दोन वर्ष दिल्ली परेडसाठी कोणत्याच महाविद्यालयाला हे यश प्राप्त झाले नाही . परंतु श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी विभागाने हे सिद्ध करून दाखविले आहे.दिल्ली येथे प्रत्येक वर्षी होणाऱ्या या संचलनासाठी देशातुन सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशातुन एकुण 17 निदेशालयातुन एनसीसी कॅडेटस ड्रिल, सांस्कृतिक,बेस्ट कॅडेट,गार्ड ऑफ ऑनर,लाईन एरिया अशा विविध प्रकारा मधुन विभिन्न सांस्कृतिक,परंपरा, वेशभुषाचे प्रदर्शन या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या राज्याचे नेतृत्व करत असतात.26 जानेवारी दिल्ली येथे होणाऱ्या गणतंत्र दिवस शिबीरासाठी अनेक कठिन चाचण्या,परीक्षा पूर्ण करून ते कॅडेटस इथपर्यंत पोहचतात प्रत्येक कॅडेटसचे एनसीसी मध्ये प्रवेश घेतल्या नंतर सर्वात मोठे ध्येय ,उदिष्ट,स्वप्न याच शिबीराचे असते रांत्रदिवस एक करून हे कॅडेटस कँपची तयारी करत असतात.हे शिबीर कॅडेटसचे भवितव्य ठरवणारे असते.मौजे हिप्परगा ता.उमरगा जि.धाराशिव येथील छोट्याशा गावातुन कठिन अशा परिस्थितीताला सामोरे जाऊन सर्वसाधारण गरीब कुटुंबात जन्म घेतलेला वडिल दुसऱ्याच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणुन काम करतात. अर्जुने स्वतःच्या जिद्द, आत्मविश्वास,कठोर परिश्रमातुन हे यश पूर्ण करून दाखविले आहे.वंश परंपरागत घरामध्ये लोकगीत, लोकसंगीत गोंधळ, वाघ्या - मुरळी अशा कार्यक्रमातुन वडिल ,मोठा भाऊ व स्वतः अर्जुन घर चालवतात खंडोबा,आई तुळजा भवानीचे संबळ वाजवुन पुजा व नामस्मरण करतात तसेच आज सुद्धा गावोगावी खंडोबा,देवीचे गोंधळ करून नविन गृहप्रवेश,नवदांपत्यास आशीर्वाद मिळावे यासाठी गोंधळ ,वाघ्या-मुरळी म्हणून या कार्यक्रमातुन त्याचे देवी - देवताचे स्त्वन - नवस करत असतात.याच कार्यक्रमा मध्ये संबळ वाद्य मोलाची भूमिका बजावतो व यावर्षी याच वाद्या मधुन आज त्याची महाराष्ट्राच्या संघातुन त्याची निवड झालेली आहे . एक्किवीसव्या शतका मध्ये आपण जरी नविन पाश्चात्य गीत, गायन , वाद्य या संस्कृतीला स्विकारत असलो तरी कुठे तरी त्याचे संरक्षण अशा व्यासपिठाचा माध्यमातून होत असते.वर्तमानात आज घडीला जुन्या,प्राचीन वाद्य, संगीत कला प्रकार लोप पावत आहेत परंतु अर्जुन ने दाखवुन दिले की ही कला , वाद्य किती महान आहेत . महाराष्ट्राची पारंपारिक,ऐतिहासिक हे वादय तो देशाच्या पटलावर तो संबळ या वादयाच्या माध्यमातून त्याचा ठसा त्यांनी उमटवला आहे .महाराष्ट्राच्या प्राचीन परंपरेचे लोककला , लोकसंगीताचे जतन,संरक्षण, तो करत आहे. या यशबदल त्याचे सर्व स्तरातुन त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव संपुर्ण धाराशिव जिल्हयातून,उमरगा तालुक्यातुन होत आहे.तसेच वाईपी म्हणजेच युथ एक्सचेंज प्रोग्राम या मध्ये सुद्धा त्याची संबळ वादयातुन भारताच्या संघात त्याची निवड झाली आहे.अर्जुनला 53 महाराष्ट्र एनसीसी बरालियन लातूरचे कमान अधिकारी कर्नल संतोष नवगन,अॅडम ऑफिसर कर्नल वाय बी सिंग,सुभेदार मेजर शंभु सिंग त्यांच्या सर्व सैन्यदलातील संघ, कार्यालयीन कर्मचारी व कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी अर्जुन कडुन खुप मेहनत करून घेतली व त्याला मार्गदर्शन केले.या यशा बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे,सर्व संस्थेचे संचालक मंडळातील सदस्यांनी त्याचे कौतुक व अभिनंदन केले.तसेच या शिबीरात सहभागी झाल्या बदल प्राचार्य डॉ संजय अस्वले,उप्राचार्य डॉ विलास इंगळे,डॉ पदमाकर पिटले,प्रा गुंडाबापु मोरे,शैलेश महामुनी,श्री नितीन कोराळे, राजकुमार सोनवणे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका कॅडेटस,विद्यार्थी,शिक्षेकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने त्याच्या उत्तुंग यशिस्वेतेसाठी शुभेच्छा दिल्या .

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ जानेवारी २०२६


## सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात सत्यशोधक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर :** सत्यशोधक समाज संघ आयोजित सत्यशोधक समाजाचे 43 वे राज्य अधिवेशन, छत्रपती संभाजीनगर येथे 3 व 4 जानेवारी रोजी संपन्न झाले. हे अधिवेशनाचे एकूण चार सत्रात पार पडले.प्रथम सत्र शहीद भगतसिंग संस्कृतीक मंच आयोजित अध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर व प्रमुख पाहुणे डॉ.सुनील धुळे, इंजिनिअर शिवाजी लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले असून या मध्ये सत्यशोधक चळवळीचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले, एकूण 20 शाळेंनी सहभाग नोंदविला होता. या मध्ये विविध नृत्य ,नाटके, स्वरचित गीत,कविता व रॅपसाँग या सारखे विविध वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजवणारे व समताप्रस्थापित मानवतावादी विचारांचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले. यामध्ये सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले व डॉ.बाबासाहेबआंबेडकर यांचे गीत सादर केले त्याचबरोबर तुम्हीच नाव ठरवा हे नाटक सादर करण्यात आले. कार्यक्रमासाठी स्नेहा खोडके, निकिता दगडघाटे, प्रणाली खरात , वैष्णवी जाधव,रोहन घोडे, संभाजी घोडे, विशाल खोडके, चेतन फुके इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुनील वाकेकर व संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले व त्यांनी मराठवाड्याची राजधानी छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी विद्यार्थ्यांना स्टेज उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक आय.एस.पठाण, एल.एस.पांढरे, डी.बी.मगरे, डी.के.सुलताने, श्रीमती आशा दांडगे , श्रीमती वर्षा जाधव, श्रीमती जया गुजर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.



**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक मोहसीन खान यांचे स्वागत करताना डॉ. किशोर सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.हसन इनामदार, लहरे उस्ताद आणि राजेश लहरे आदी दिसत आहेत**

## जिंतूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी महेमुन्निसा फैय्याज खान पठाण यांची सर्वानुमते निवड



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी नगरसेविका महेमुनिसा फायाज खान पठाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायती अधिनियम 1965 तसेच संबंधित नियमांनुसार ही निवड प्रक्रिया पार पडली असून, याबाबतची अधिकृत अधिसूचना प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे.जिल्हाधिकारी परभणी व उपविभागीय अधिकारी सेलू यांच्या निर्देशानुसार नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस क्रमांक एमसी/स.सभा/2025-26/2535 व निवड कार्यक्रम क्रमांक एमसी/स.सभा/2025-26/2536 अन्वये उपनगराध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया राबविण्यात आली.दि. 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 या कालावधीत उपनगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत महेमुनिसा फायाज खान पठाण यांचे नामनिर्देशन दाखल झाले. नामनिर्देशन अर्जाची छाननी करण्यात आली असता तो वैध आढळून आला. इतर कोणतेही नामनिर्देशन अर्ज दाखल न झाल्याने महेमुनिसा फायाज खान पठाण यांची बिनविरोध व सर्वानुमते उपनगराध्यक्षपदी निवड घोषित करण्यात आली. उपनगराध्यक्षपदासाठी दिलेले आश्वासन पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी पूर्ण केल्याने जिंतूर शहरातील नागरिकांमध्ये तसेच समर्थकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.महेमुनिसा फायाज खान पठाण या मागील पाच वेळेस सातत्याने आपल्या प्रभागातून निवडून येत असून, त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रामाणिकपणे व प्रभावीपणे सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज, ड्रेनेज, गटार व्यवस्था आदी मूलभूत नागरी सुविधांसाठी त्यांनी वेळोवेळी प्रशासनाशी समन्वय साधून प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यामुळेच प्रत्येक निवडणुकीत नागरिकांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत सलग पाच वेळा त्यांना निवडून दिले आहे.नगरपालिका निवडणुकीनंतर उपनगराध्यक्ष पदाबाबत चर्चा सुरू झाल्यानंतर "ज्यांनी प्रत्यक्ष काम करून दाखवले, जनतेशी थेट जोड असलेले अनुभवी लोकप्रतिनिधी यांनाच संधी मिळावी" अशी ठाम भूमिका नागरिकांमधून व्यक्त होत होती. याच पार्श्वभूमीवर महेमुनिसा फायाज खान पठाण यांना उपनगराध्यक्ष पद देण्यात यावे, अशी जोरदार मागणी जनतेतून होत होती.महेमुनिसा फायाज खान पठाण या नेहमीच नागरिकांसाठी उपलब्ध राहणाऱ्या, तक्रारी ऐकून घेणाऱ्या व त्यावर तात्काळ उपाययोजना करणाऱ्या लोकप्रतिनिधी म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा प्रशासकीय अनुभव, कार्यपद्धती व मजबूत जनाधार लक्षात घेता त्या उपनगराध्यक्ष पदासाठी योग्य उमेदवार असल्याचे मत राजकीय व सामाजिक वर्तुळात व्यक्त होत होते.अखेर नगरपालिकेतील नेतृत्वाने जनतेच्या अपेक्षांची दखल घेत महेमुनिसा फायाज खान पठाण यांची सर्वानुमते उपनगराध्यक्षपदी निवड जाहीर केली. नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी अधिकृत घोषणा केली.यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, माजी नगराध्यक्ष मुन्ना गोरे, नगरसेवक गोपाळ रोकडे, राजा वैष्णव, गनी कुरैशी, अथर हाजी यांच्यासह इतर नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.महेमुनिसा फायाज खान पठाण यांच्या निवडीमुळे जिंतूर शहरातील विकासकामांना नव्या गती मिळेल तसेच नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे मार्गी लागतील, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रीय युवक सप्ताह निमित्त शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे विविध स्पर्धेचे आयोजन



**कन्नड :** शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद जयंती, राष्ट्रीय युवक सप्ताह निमित्य साधून २०० मीटर व ४०० मीटर धावणं, गोळा फेक, रस्सीखेच व क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी रिबीन कापून व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन यावेळी त्यांनी म्हटले की, "स्वामी विवेकानंद प्रमाणे विद्यार्थ्यांनी सतत खेळात, अभ्यासात तेजोमय व उत्साहित राहिले पाहिजे" यावेळी सहभागी विद्यार्थ्यांचे क्रमांक काढून त्यांना बक्षीस वाटप करण्यात आले सदरील स्पर्धेच्या आयोजनात एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उदय डोंगरे, प्रा. सोमेश मोगरे, प्रा. प्रगती चव्हाण, प्रा. सरवदे प्रा.बारगळ मॅडम व विद्यार्थी उपस्थित होते



**प्रभाग क्र. चार मधील वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित नगरसेवक आणि माजी विरोधी पक्षनेते तथा कामाचा माणूस म्हणून संपूर्ण छ. संभाजीनगर (औरंगाबाद) शहरात परिचित असलेले नेते अफसर खान (बॉस) तसेच या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेणारे मुजीब खान, अशरफ खान यांचा सत्कार करताना दैनिक महाराष्ट्र जनशक्तीचे मुख्य संपादक प्राचार्य डॉ. हसन इनामदार आणि साहिल कॉम्प्युटरचे संचालक इरफान इनामदार**

## स्मृतिशेष डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या जयंती निमित्त उद्योजकता मेळावा, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**नागपूर :** पीपल्स वेलफेअर सोसायटीचे संस्थापक व माजी आमदार स्मृतिशेष डॉ. मधुकरराव वासनिक यांचे जयंती निमित्य दिनांक 19 व 20 जानेवारी ला दोन दिवसीय उद्योजकता मेळावा आणि 21 ते 23 जानेवारी 2026 दरम्यान वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात येत आहे. या उद्योजक मेळावा आणि महोत्सवाचे उदघाटन दि. १९ जानेवारी ला श्री. हेमंत वाघमारे (केंद्र प्रमुख, एम. सी. ई. डी. नागपूर विभाग, नागपूर) यांचे हस्ते आणि पीपल्स वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न होणार आहे. या उदघाटन सत्राच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे राहतील.

या प्रसंगी आयोजित उद्योजकता मेळाव्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्वयं रोजगार व उद्योजक कौशल्यास वाव मिळावा आणि आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने स्वत: विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री तसेच ग्रामीण भाग आणि परिसरातील होतकरू महिला उद्योजिका , महिला बचत गट यांनी निर्मित केलेल्या वस्तु जसे खाद्यपदार्थ ,वाळवणीचे पदार्थ , चविष्ट लोणची , सजावटीच्या वस्तु, हँडलूम वस्तु , भरतकाम आणि नक्षीदार कापड , विविध घरगुती उपयोगाच्या वस्तु, सुगंधी पदार्थ , हर्बल उत्पादने, आरोग्यवर्धक उत्पादने इत्यादि वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री या मेळाव्यात करता येईल.

आयोजन समिति च्या प्रमुख प्राचार्य डॉ. प्रज्ञा बागडे, समन्वयक - प्रा. निशा मोहन वासनिक( सदस्य- पीपल्स वेलफेअर सोसायटी) महिला समिति च्या समन्वयक डॉ. अमृता डोरलीकर, (९३२६२३४२८२) , सांस्कृतिक समितीचे प्रमुख व मेळाव्याचे सह - समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील ( ९४२१७०६५०४) व प्रा. गामिनी मेश्राम ( उप प्राचार्य – कनिष्ठ महाविद्यालय ) तसेच खालील सदस्य- अनुक्रमे डॉ. मनिषा नागपुरे , डॉ. विवेक चव्हाण ( ९३७३६९६३४२) , डॉ. अमोल मेंढे ( ९५५२४५९०९४) , डॉ. सुशांत चिमनकर ( सह- समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना - ८२७५२९१२५२) डॉ. कमलाकर तागडे (९४२३६३४६५०) , डॉ. सौरभ मोहोड ( संचालक- शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग ९५७९११७६५०) , प्रा. सिद्धार्थ वाणी – ग्रंथपाल ८६९८८२४९६६) यांच्याशी उद्योजकता मेळाव्यात सहभागासाठी भ्रमण ध्वनि वर संपर्क साधावा. उद्योजकांना आपल्या स्टॉल साठी १००० रुपये इतक्या माफक दरात नोंदणी करता येईल. शहरातील आणि महाविद्यालय परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या मेळाव्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आलेले आहे.


प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## आदर्श महाविद्यालयात रंगले कविसंमेलन व प्रकाशन सोहळा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** काव्यांगण साहित्य मंचच्या वतीने उमरगा येथील आदर्श महाविद्यालयात आज महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या विविध कवींनी विविध विषयावरच्या तब्बल 50 कविता सादर करीत सारे सभागृह भारावून टाकले.स्वरचित मराठी कवितांची एक बहारदार मैफल उमरगेकरांनी अनुभवली. "शब्द नवे ,अर्थ नवे ,कवितांचा हा विश्वासोहळा" ही संकल्पना घेऊन काव्यांगण साहित्य मंचाचे अध्यक्ष काव्यप्रेमी मा. विकास राठोड यांनी या अनुभूती सोहळ्याचे आगळे वेगळे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर प्रातिनिधिक कवींच्या कविता घेऊन काव्यदीप नावाच्या कवितासंग्रहाचे प्रकाशनही व कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. सोलंकर यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात पार पडण्यात आला. याप्रसंगी,आदर्श कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक मा.शेख ,समाज विकास संस्थेचे डॉ. कल्पना वाघ , काव्यांगणचे अध्यक्ष मा. विकास राठोड हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अयान मौजान, सुदर्शन जोशी, स्वप्नील कांबळे, सई शिंदे यांनी अत्यंत खुमासदार पद्धतीने केले.प्रास्ताविक विकास राठोड यांनी केले.प्रमुख उद्‌घाटक प्राचार्य डॉ.राम सोलंकर यांनी औपचारिक उद्‌घाटन झाल्याचे सांगून विकास राठोड यांचे भरभरून कौतुक केले.अशा दुष्कर परिस्थितीतही कवी संमेलन आयोजित करणे हे फार मोठे धारिष्ट्याचे काम आहे.कविता ही त्यात्या व्यक्तींच्या प्रकृतीनुसार जन्माला येत असते.आपल्या मनातील भावना शब्दबद्धः करणे हे सगळ्यांना जमत नसते,त्यासाठी कवी आणि रसिक या दोहोंकडे कल्पनाशक्ती असायला हवी.नाती जोडू प्रेमाची या बहारदार कविसंमेलनाला शुभेच्छा दिल्या व काव्यदीप या प्रातिनिधिक कवितासंग्रहाचे प्रकाशन केले.यावेळी प्रमुख उपस्थित मा.मुख्याध्यापक शेख यांनीही कविसंमेलनाला शुभेच्छा दिल्या.या संमेलनाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.लहान ,मोठे मुली ,महिला यांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद आणि महिलां कवयित्रींची संख्या वाखाणण्याजोगी होती. काशीबाई राजपूत, स्नेहा जाधव, वृंदा गंभीर, स्वाती खंदारे,चंद्रकांत नरटे, नागसेन कांबळे, रविराज राठोड, सायली ढेबे, आरती मोहेकर, माचे कृष्णाबाई बाबुराव, विवेक जोशी, सुभाष चव्हाण , विलास बाबर, वर्षारणी मुस्कावाड, किशोर पांचाळ, कल्पना सुरवसे, रमा मन्नाडे, गिरीश तुळजापूरे, चंदा चौसदीकर, की. पी. बिराजदार, कांचन कांबळे, सुनील राठोड, अविनाश कांबळे, सूरज हणमंते, बाळासाहेब मगर आदी कवींनी अत्यंत बहारदार कविता सादर केल्या. शेती, निसर्ग, प्रेम , आई, वडील आदी सर्व विषय त्यांच्या कवितेतून प्रतिबिंबित झाले. "धोका नव्हे दिला तिने, कविता देऊन गेली"," तुझं हात हाती दे जराअशी तू जवळ ये जरा",आजही तिची याद येते मला, कोठेही घेऊन जाते मला., अशा अनेक कवितांना रसिक श्रोत्यांनी भरपूर दाद दिली.काकासाहेब कांबळे यांनी "ही मैफिल मजला सुनी वाटते " ही गेय कविता सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ जानेवारी २०२६


## असे काय झाले

उन्हाला कळेना असे काय झाले
चोचले पावसाचे कसे वाढलेले
उन्हात पावसाचे आता येणे जाणे
हिशोब ऋतूंचे सारे चुकलेले

कधी श्रावणात ऊन हसलेले
ढग वैशाखात वाट चुकलेले
दिशा हरवता उन्हाच्या शिवारी
बळी रडगाणे भाळी लिहिलेले

तास तिफणीचे रानी हुकलेले
गाणे पेरत्याचे मनी थिजलेले
पुरात घामाच्या स्वप्नं वाहिलेले
मातीत कुणब्याचे जिणे भरडलेले



**कवी- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**जिल्हा छत्रपती संभाजीनगर**

## अंबाळा येथे भव्य आदिवासी जनजागृती मेळाव्याचे आयोजन



**कन्नड (अरुण थोरात) :** सह्याद्री आदिवासी ठाकर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या २१ व्या वर्धापन दिना निमित्त दि. २० जानेवारी रोजी अंबाळा ता. कन्नड येथे आदिवासी जागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सह्याद्री आदिवासी ठाकूर, ठाकर समाज उन्नती मंडळी ही संस्था गेली २१ वर्षे आदिवासी ठाकर समाजाच्या विकास व प्रबोधनासाठी काम करीत आहे. मराठवाड्याचा सीमावर्ती भाग असलेल्या संभाजीनगर सह नाशिक, जळगाव जिल्ह्यातील सुमारे ३२ वाडी वस्त्यांतून आदिवासी ठाकर समाज वास्तव्यात आहे. पशुपालन, ऊसतोडी, शेती, शेतमजूरी वरती उपजिविका करणाऱ्या या समाजात होत असलेल्या जनजागृती मुळे समाजाने वेगवेगळ्या क्षेत्रांत आपले स्थान निर्माण केले आहे. यामुळे समाज आधुनिक प्रवाहात सहभागी झाला आहे. असे असले तरी अजून ही काही बाबतीत समाज मागसलेला आहे. समाजातील सदस्यांना शिक्षण, आरोग्य, रुढीपरंपरा, रोजगार, आदींचे मार्गदर्शन करण्यासाठी दरवर्षी ठिकठिकाणी समाज जागृती मेळाव्यांचे आयोजन केल्या जात आहे. याचाच एक भाग म्हणून शंभर टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या अंबाळा ठाकरवाडी येथे मंगळवारी हा मेळावा इगतपुरी चे मा.आ. पांडूरंग गांगड यांच्या अध्यक्षते खाली संपन्न होत आहे.मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून शहापूर चे आमदार तथा अनुसूचित जमाती कल्याण समिती महाराष्ट्र राज्य चे प्रमुख आ. दौलतराव दरोडा, संघटनेचे महाराष्ट्र संपर्क प्रमुख जानू पांडू हिरवे उपस्थित राहणार आहेत. तसेच अतिथी म्हणून कन्नड च्या आमदार संजनाताई जाधव, मा.आ. काशिनाथ मेंगाळ(इगतपुरी), से.नि.आरोग्य संचालक पुनाजी गांडाळ, मा.आ. उदयसिंग राजपूत, मा.आ. श्रीरंग शिरवे(शहापूर), मा.आ. हर्षवर्धन जाधव, मा.आ. पांडूरंग बरोरा(शहापूर), आदिवासी प्रकल्प अधिकारी चेतना मोरे, जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, आदिवासी जातपडताळणी सह आयुक्त प्रिती बोंदरे, पोलीस आयुक्त अपारिजिता अग्निहोत्री, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश साळुंखे यांच्या सह विविध विभागांचे अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, समाज बांधव उपस्थित राहणार आहेत. अधिकाधिक समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे अवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.






## उमेदवारी द्या, नाहीतर फास घ्यायला दोरी द्या : उदयनराजे भोसलेंच्या कट्टर समर्थकांची अजब मागणी



**सातारा :** राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असून, सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ जागांसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर, मसूर जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेले खासदार उदयनराजे भोसले यांचे समर्थक कुलदीप क्षीरसागर यांनी जलमंदिर येथे राजेंची भेट घेऊन आपली दावेदारी मांडली. या भेटीदरम्यान उमेदवारीची मागणी करताना क्षीरसागर यांनी, "उमेदवारी द्या, नाहीतर फास घ्यायला दोरी द्या," अशी मिश्कील टिप्पणी केल्याने उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

साताऱ्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांची मोठी ओढाताण सुरू आहे. मसूर जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेले खासदार उदयनराजे भोसले यांचे कट्टर समर्थक कुलदीप क्षीरसागर यांनी आता आपली दावेदारी प्रबळ केली आहे. यापूर्वी कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची त्यांची इच्छा होती, मात्र उदयनराजेंच्या शब्दाखातर त्यांनी माघार घेतली होती. राजेंच्या प्रत्येक निवडणुकीत प्रचाराची धुरा समर्थपणे सांभाळणाऱ्या क्षीरसागर यांनी आता जिल्हा परिषदेसाठी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपली उमेदवारी मागितली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ जानेवारी २०२६


# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**छत्रपती संभाजीनगर :** (जिमाका)- जाहीर झालेली जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे,असे आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला त्यासंदर्भात माहिती देण्यासाठी आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पत्रकारांना संबोधित केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड आदी यावेळी उपस्थित होते.पत्रकार परिषदेत निवडणूक विषयक विविध मुद्यांबाबत माहिती देण्यात आली-निवडणूक कार्यक्रमया निवडणुकीची सूचना 16 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध होईल. नामनिर्देशन पत्र दाखल करणे- शुक्रवार दि.१६ ते मंगळवार दि.२१ जानेवारी २०२६. नामनिर्देशन पत्र छाननी- बुधवार दि.२२ जानेवारी २०२६ (सकाळी ११ वा. पासून) त्यानंतर लगेचच वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्ध होईल.उमेदवारी माघारी- दि.२३, दि.२४ जानेवारी व दि.२७ जानेवारी २०२६ सकाळी ११ ते दुपारी ३ वा. पर्यंत. निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवार यादी प्रसुद्धी- मंगळवार दि.२७जानेवारी दुपारी साडेतीन वा.

नंतरमतदान- गुरुवार दि.५ फेब्रुवारी २०२६ सकाळी साडेसात ते सायं. साडेपाच वा. पर्यंत. मतमोजणी-शनिवार दि.७ फेब्रुवारी सकाळी १० वा. पासून.६३ गट, १२६ गणजिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक जिल्ह्यात एकूण जिल्हा परिषदचे ६३ गट आणि पंचायत समितीचे १२६ गण क्षेत्रात होणार आहे. त्यासाठी १ जुलै २०५ रोजी अंतिम झालेली मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. तालुकानिहाय गट व गणांची संख्या याप्रमाणे- सोयगाव-३ गट, ६ गण, सिल्लोड-९ गट, १८ गण, कन्नड-८ गट, १६ गण, फुलंब्री ४ गट, ८ गण, खुलताबाद-३ गट, ६ गण, वैजापूर-८ गट, १६ गण, गंगापुर-९ गट, १८ गण, छत्रपती संभाजीनगर १० गट, २० गण, पैठण ९ गट, १८ गण असे एकूण ६३ गट व १२६ गण आहेत. त्यासाठी प्रत्येक तालुकानिहाय एक निवडणूक निर्णय अधिकारी व एक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी काम पाहतील. एकून २२८२ मतदान केंद्रांवर नागरिक आपला मतदानाचा हक्क बजावतील. तालुकानिहाय मतदान केंद्र संख्या याप्रमाणे- सोयगाव-११३, सिल्लोड-३०५, कन्नड-३१७, फुलंब्री-१५५, खुलताबाद-१०४, वैजापूर-२८१, गंगापूर-३४७, छत्रपती संभाजीनगर-३५४, पैठण-३०६.१० हजारांहून अधिक मनुष्यबळाची आवश्यकता २२८२ मतदान केंद्रावर मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील त्यासाठी १० हजार ०४८ अधिकारी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून १२ हजार मनुष्यबळाची उपलब्धता आहे, असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. या मनुष्यबळाची सेवा उपलब्ध करुन घेणे, त्यांचे प्रशिक्षण घेणे. विविध समित्यांचे गठन करणे अशा विविध प्रशासकीय प्रक्रिया पार पाडण्यात आल्या आहेत.निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्ह्यात ९ निवडणूक निणय अधिकारी व ९ सहा. निवडणूक निर्णय अधिकारी असतील. या सर्व प्रक्रियेवर जिल्हास्तरीय कार्यालयातून नियंत्रण ठेवले जाईल, असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.५०२४ मतदान यंत्रे लागणारजिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी जिल्ह्यात ५०२४ मतदान यंत्रे, २५१२ कंट्रोल युनिट लागणार आहे. ही यंत्रे नांदेड हून मागविली जाणार आहेत. त्यात ३०४८ कंट्रोल युनिट,५५९२ मतदान यंत्रे येणार आहेत. या यंत्राचे प्रथम स्तरीय पडताळणी जिल्हास्तरावर करुन नंतर ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर पाठवण्यात येतील.संबंधित क्षेत्रात आचारसंहितानिवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. संबंधित क्षेत्रात ही आचारसंहिता लागू झाली असली तरी अन्य ठिकाणीदेखील संबंधित जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही; परंतु नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने 4 नोव्हेंबर 2025 रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल.१८ लक्ष ७३ हजार मतदार बजावतील हक्कजिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात येतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराला एक मत जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागासाठी आणि एक मत पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी द्यावे लागते. त्यामुळे एका मतदाराने दोन मते देणे अपेक्षित असते.मतदार संख्या- तालुकानिहाय मतदार संख्या याप्रमाणे- सोयगाव- पुरुष-४५९७१, स्त्री-४१७७५ इतर- १, एकूण-८७७४७सिल्लोड- पुरुष-१२९८६५, स्त्री-११९००८ इतर- १, एकूण-२४८८७४कन्नड- पुरुष-१३५५५३, स्त्री-१२२५२३ इतर- ४, एकूण-२५८०८०फुलंब्री- पुरुष-६६७५१, स्त्री-६१०७१ इतर- १, एकूण-१२७८२३खुलताबाद- पुरुष-४४४५३, स्त्री-४०८५३ इतर- १, एकूण-८५३०७वैजापूर- पुरुष-११६९४३, स्त्री-१०७००४इतर- ०, एकूण-२२३९४७गंगापूर- पुरुष-१५५२०६, स्त्री-१४२५४४ इतर- १४, एकूण-२९७७६४छत्रपती संभाजीनगर- पुरुष-१५५२२४ स्त्री-१४०५२७ इतर- १५, एकूण-२९५७६६पैठण- पुरुष-१२९२६८, स्त्री-११८४७३ इतर- ४, एकूण-२४७७४५जिल्ह्यात एकूण ९ लाख ७९ हजार २३४ पुरुष , ८ लाख ९३ हजार ७७८ स्त्री तर ४१ इतर असे एकूण १८ लक्ष ७३ हजार ०५३ मतदार आपल मतदानाचा हक्क बजावतील.नामनिर्देशनपत्रे ऑफलाईन पद्धतीनेनगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या वेळी ऑनलाईन पद्धतीने नामर्निर्देशनपत्रे व शपथपत्रे भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती; परंतु विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन या निवडणुकांच्या शेवटच्या टप्प्यात पारंपरिक पद्धतीने म्हणजे ऑफलाईन पद्धतीने नामर्निर्देशनपत्रे व शपथपत्रे स्वीकारण्यात आली. त्यानंतर महानगरपालिका निवडणुकीतसुद्धा ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे

स्वीकारण्यात आले होते. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही आता ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देनपत्रे स्वीकारण्यात येतील. ‘जातप्रमाणपत्र वैधता राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते; परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा देणे आवश्यक राहील. निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल.कायदा सुव्यवस्थाया निवडणूकीसाठी जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असून त्यासाठी जिल्ह्यात १९३ अधिकारी, ३०० पोलीस कर्मचारी, १९३२ होमगार्डस जिल्ह्यात उपलब्ध आहेत. शिवाय राज्य राखीव पोलीस दलाच्या ३ कंपन्या बाहेरील जिल्ह्यातून मागविण्यात येणार आहेत. या शिवाय प्रतिबंधात्मक कारवाई राबविण्यात येऊन समाजकंटकांवर कारवाई करण्यात येत आहे. शस्त्र जमा करणे आदी कारवायाही सुरु आहेत,असे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी सांगितले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ जानेवारी २०२६

# महाराणा प्रताप : लोककल्याणाच्या सामाजिक कार्याची अमर परंपरा

**भा**रतीय इतिहासाच्या दीर्घ आणि समृद्ध परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे स्मरण केवळ त्यांच्या पराक्रमामुळे किंवा राजकीय संघर्षामुळे मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या सामाजिक जाणिवा, लोककल्याणाची भूमिका आणि मूल्यनिष्ठ जीवनामुळे ती व्यक्तिमत्त्वे काळाच्या पलीकडे जाऊन समाजमनावर अधिराज्य गाजवतात. महाराणा प्रताप हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांना केवळ हल्दीघाटीच्या रणांगणावर लढणारा पराक्रमी योद्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यांच्या जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या सामाजिक कार्यात, प्रजेप्रती असलेल्या निष्ठेत, स्वाभिमानाच्या भूमिकेत आणि लोककल्याणासाठी केलेल्या त्यागात दडलेला आहे. महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन हे समाजकेंद्रित विचारांचे, मानवी मूल्यांचे आणि स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाचे प्रतीक होते.सोळाव्या शतकातील भारत हा सत्तासंघर्षांचा, साम्राज्यविस्ताराचा आणि सामाजिक उलथापालथींचा काळ होता. मुघल साम्राज्याच्या विस्तारामुळे अनेक प्रादेशिक राज्यांवर परकीय सत्तेचे वर्चस्व निर्माण झाले होते. अकबराच्या काळात अनेक राजांनी मांडलिकत्व स्वीकारून आपले राज्य, वैभव आणि व्यक्तिगत सुरक्षितता जपण्याचा मार्ग निवडला. परंतु महाराणा प्रताप यांनी हा मार्ग नाकारला. त्यांनी परकीय सत्तेच्या अधीन जाणे म्हणजे केवळ राजकीय पराभव नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक अध:पतन असल्याचे स्पष्टपणे ओळखले. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे फक्त सत्ता नव्हे, तर समाजाचा आत्मसन्मान, सांस्कृतिक अस्मिता आणि मूल्यनिष्ठ जीवन होते.महाराणा प्रताप यांची सामाजिक भूमिका त्यांच्या प्रजाभिमुख नेतृत्वातून स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी स्वत:ला कधीही प्रजेपेक्षा श्रेष्ठ मानले नाही. राजा म्हणजे ऐश्वर्य उपभोगणारा नव्हे, तर समाजाच्या दु:खात सहभागी होणारा सेवक असतो, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला. संकटाच्या काळात त्यांनी राजवाडे, सुखसोयी आणि वैभवाचा त्याग करून आपल्या प्रजेबरोबर जंगलात, डोंगरदऱ्यांत कष्टाचे जीवन स्वीकारले. हा त्याग केवळ व्यक्तिगत नव्हता, तर समाजाशी असलेल्या त्यांच्या अतूट नात्याचे प्रतीक होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे नेतृत्व ‘लोककेंद्रित सत्तेचे’ आणि ‘सामाजिक जबाबदारीच्या राजसत्तेचे’ उत्कृष्ट उदाहरण ठरते.हल्दीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे आयुष्य अत्यंत कष्टमय झाले. अन्नधान्याची टंचाई, आर्थिक अडचणी, सततचा संघर्ष आणि मुघल सत्तेचा दबाव असूनही त्यांनी आपल्या प्रजेचा त्याग केला नाही. उलट, या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी समाजाला धैर्य, आशा आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. जंगलात राहून त्यांनी जे कष्टाचे जीवन जगले, ते समाजासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या जीवनातून समाजाला हे समजले की स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्याग, संयम आणि संघर्ष अपरिहार्य असतो.महाराणा प्रताप यांच्या सामाजिक कार्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा आदिवासी समाजाशी असलेला घनिष्ठ संबंध. त्या काळात आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जात होते आणि त्यांच्याकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जात होते. परंतु महाराणा प्रताप यांनी या समाजाला स्वराज्याच्या संघर्षात समान भागीदार मानले. आदिवासी समाजाने महाराणा प्रताप यांना जंगलात अन्न, निवारा, मार्गदर्शन आणि संरक्षण दिले. हे नाते परस्पर सन्मान, विश्वास आणि समानतेवर आधारित होते. महाराणा प्रताप यांनी आदिवासी समाजाच्या श्रमशीलतेचा, निष्ठेचा आणि स्वातंत्र्यप्रिय स्वभावाचा सन्मान केला. त्यामुळे समाजातील वंचित घटक स्वराज्याच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले आणि सामाजिक समावेशनाचा एक आदर्श निर्माण झाला.स्वावलंबन ही महाराणा प्रताप यांच्या सामाजिक विचारांची केंद्रस्थानी असलेली संकल्पना होती. मुघल सत्तेने मेवाडवर आर्थिक नाकेबंदी केली तेव्हा राज्यात दारिद्र्य, उपासमारीची आणि असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळी परकीय सत्तेकडून मदत स्वीकारण्याऐवजी महाराणा प्रताप यांनी स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यावर भर दिला. जंगलसंपत्ती, शेती, पशुपालन, हस्तकला आणि स्थानिक उद्योग यांच्या माध्यमातून समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा दृष्टिकोन केवळ आर्थिक नव्हता, तर सामाजिक आत्मनिर्भरतेचा आणि स्वाभिमानाचा पाया घालणारा होता. पुढील काळातील स्वदेशी चळवळीच्या विचारांचे बीज या धोरणात दिसून येते.महाराणा प्रताप यांच्या जीवनातील नैतिक मूल्ये त्यांच्या सामाजिक कार्याचा कणा होती. त्यांनी युद्धातही मानवी मूल्यांचे उल्लंघन केले नाही. स्त्रिया, मुले आणि सामान्य नागरिक यांच्यावर अन्याय होणार नाही, याची त्यांनी विशेष काळजी घेतली. युद्ध जिंकण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंब करणे त्यांनी नाकारले. शत्रूशी लढताना देखील नीती, प्रामाणिकपणा आणि सन्मान यांचा त्याग त्यांनी केला नाही. समाजाला त्यांनी हे शिकवले की उद्दिष्ट कितीही महान असले तरी साधने शुद्ध आणि नैतिक असली पाहिजेत.स्त्रियांच्या सन्मानाबाबत महाराणा प्रताप यांची भूमिका अत्यंत प्रगत आणि संवेदनशील होती. त्या काळात स्त्रियांना युद्धकैदी बनवणे, अपमानित करणे किंवा त्यांच्यावर अत्याचार करणे सामान्य मानले जात असताना महाराणा प्रताप यांनी अशा कृत्यांना ठाम विरोध केला. स्त्री ही समाजाची आधारस्तंभ आहे, तिचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान आहे, ही भावना त्यांच्या धोरणांतून आणि कृतीतून स्पष्टपणे व्यक्त होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही भूमिका स्त्री-सन्मान आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.महाराणा प्रताप यांनी शिक्षण, संस्कार आणि सांस्कृतिक परंपरा यांना देखील महत्त्व दिले. त्यांनी आपल्या कुटुंबात आणि सहकाऱ्यांमध्ये शौर्याबरोबरच नीतिमूल्ये, समाजनिष्ठा आणि देशभक्तीचे संस्कार रुजवले. त्यांच्या पुत्र महाराणा अमरसिंह यांच्यात दिसणारी स्वाभिमानाची, लोककल्याणाची आणि संघर्षशीलतेची भावना ही महाराणा प्रताप यांच्या संस्कारांचीच देणगी होती. सामाजिक नेतृत्वाची ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली आणि मेवाडच्या स्वाभिमानाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली.महाराणा प्रताप यांचे सामाजिक कार्य केवळ मेवाडपुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या संघर्षामुळे संपूर्ण भारतीय समाजाला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि सांस्कृतिक अस्मितेचे महत्त्व पटले. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, पराभव न मानण्याचा आणि समाजहित सर्वोच्च मानण्याचा मार्ग होता. त्यामुळे महाराणा प्रताप हे केवळ इतिहासातील योद्धे न राहता लोकनायक ठरले. त्यांच्या जीवनकथेतून समाजाला संघर्षाची दिशा आणि मूल्यांची जाणीव मिळाली.आजच्या काळात महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांचे सामाजिक विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही समाज आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय, सांस्कृतिक आक्रमण आणि नैतिक अध:पतनाला सामोरे जात आहे. अशा वेळी महाराणा प्रताप यांचे जीवनकार्य आपल्याला मूल्यांवर आधारित संघर्षाची प्रेरणा देते. त्यांनी शिकवले की खरा पराभव हा तलवारीने नव्हे, तर आत्मसन्मान गमावल्याने होतो. समाजासाठी जगणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि मूल्यांशी तडजोड न करणे, हा त्यांचा वारसा आहे.महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सामाजिक जबाबदारीची, त्यागाची आणि लोककल्याणाची जिवंत गाथा होती. त्यांनी सत्ता, संपत्ती आणि वैभवापेक्षा समाजाचे हित मोठे मानले. त्यांच्या त्यागातून आणि संघर्षातून समाजाला स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला. म्हणूनच महाराणा प्रताप यांचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून सामाजिक मूल्यांची पुन:प्रतिष्ठा होय.स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांना अभिवादन करताना आपण त्यांच्या जीवनातून स्वाभिमान, सामाजिक न्याय, समता, स्वावलंबन आणि लोककल्याणाची प्रेरणा घ्यायला हवी. महाराणा प्रताप हे तलवारीपेक्षा मूल्यांवर विश्वास ठेवणारे, समाजासाठी जगणारे आणि इतिहासाला दिशा देणारे महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारांची आणि कार्याची उज्ज्वल परंपरा जपणे, हेच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

जाहिरात दर
१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-